माहिती तंत्रज्ञान विभागाकडुन उपलब्ध करून देण्यात आलेल्या डेटा एन्ट्री ऑपरेटरर्स बाबत.

महाराष्ट्र शासन

सामान्य प्रशासन विभाग,

(माहिती तंत्रज्ञान संचालनालय)

शासन परिपत्रक क्रमांक : GAD-मातंसं ०८८/२/२०१५-O/O DIT

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

दिनांक : ३१ डिसेंबर,२०१५

परिपत्रक

मंत्रालयस्तरावरील विविध विभागांकडुन येणाऱ्या मागणीनुसार विभागांच्या आवश्यकतेनुसार डेटा एन्ट्री ऑपरेटरर्स उपलब्ध करून देण्यात आले आहेत. सदर डेटा एन्ट्री ऑपरेटरर्स निक्सीच्या दरकरारावर घेण्यात आलेले होते. सदर कर्मचाऱ्यांच्या वेतनाचा खर्च सद्यस्थितीमध्ये राज्य सेतु सोसायटीकडे उपलब्ध असलेल्या निधीमधुन अदा केला जात आहे. माहिती तंत्रज्ञान विभागाचे मूळ काम हे तांत्रिक सहकार्य व मार्गदर्शन करण्याचे असल्याने विभागांना आवश्यक असलेले मनुष्यबळ पुरविणे हा विषय माहिती तंत्रज्ञान संचालनालयाच्या कार्यकक्षेच्या बाहेर आहे.

उपरोक्त वस्तुस्थिती लक्षात घेवुन उच्चस्तरीय समितीची बैठक दि. १० ऑगस्ट,२०१५ मध्ये डेटा एन्ट्री ऑपरेटरर्स किंवा तत्सम प्रकारचे मनुष्यबळ माहिती तंत्रज्ञान विभागाकडुन पुरविण्यात येऊ नये ,याबाबत निर्णय घेण्यात आलेला आहे. विविध विभागांना करारपध्दतीने डेटा एन्ट्री ऑपरेटर्सची नियुक्ती करावयाची असल्यास विहित कार्यपद्धतीनुसार करण्यात यावी. तसेच सदर मनुष्यबळासाठी आवश्यक असलेला खर्च विभागांच्या कार्यालयीन खर्चामधुन अदा करण्यात यावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१५१२३११६०५१७५९११ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Sankaranarayanan Muthukrishnan

Digitally signed by Sankaranarayanan Muthukrishnan
DN: c=IN, o=All India Service, ou=IAS, postalCode=440001, st=Maharashtra, serialNumber=ab4dccd4eed60799fead556e52add9e92399e22ed2fe3da012b0df9d0a9bd64e, cn=Sankaranarayanan Muthukrishnan
Date: 2015.12.31 16:32:27 +05'30'

(मुथुकृष्णन संकरनारायणन)
संचालक, माहिती तंत्रज्ञान

प्रत,

१. मा. राज्यपालांचे सचिव,
२. मा. मुख्यमंत्री यांचे सचिव,
३. मा. उप मुख्यमंत्री यांचे सचिव,
४. सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
५. मुख्य सचिव यांचे खाजगी सचिव,
६. शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव

७. प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा) मुंबई,
८. प्रबंधक, उच्च न्यायालय (अपिल शाखा) मुंबई,
९. प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई
१०.सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
११.सचिव, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय, मुंबई
१२.महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र, मुंबई)
१३.महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता महाराष्ट्र, नागपूर)
१४.महालेखापाल, (लेखा परीक्षा , महाराष्ट्र, मुंबई)
१५.महालेखापाल, लेखापरीक्षा महाराष्ट्र, नागपूर
१६.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई व नागपूर
१७.निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
१८. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१९.सर्व पोलीस आयुक्त
२०.सर्व विभागीय आयुक्त,
२१.सर्व महानगरपालिकांचे आयुक्त,
२२.सर्व जिल्हाधिकारी,
२३.सर्व जिल्हा परिषद / नगरपालिकांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
२४.सर्व नगरपरिषदांचे मुख्याधिकारी
२५.सर्व मंत्रालयीन विभाग
२६.मंत्रालयीन विभागाच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख
२७.सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
२८. निवड नस्ती (२ प्रती)